




दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ३२ वा | बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**
**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**

**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला


# सोलापूर जिल्ह्यात सलग पावसामुळे शेतीचे नुकसान

## महाराष्ट्रात पावसाचं तुफान

## राज्यभरात 16 जणांचा मृत्यू

**सोलापूर (सचिन जाधव):-** गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात सलग जोरदार पाऊस सुरू आहे. पावसाचा जोर अधिक वाढल्याने शेतातील उभे पीक पाण्यात गेल्याचे चित्र आहे. विशेषतः भात, सोयाबीन, आणि मका या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

काही ठिकाणी नाल्यांना पूर आल्याने शेतीचे पाणी बाहेर निघण्यास अडथळा निर्माण झाला आहे. उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुक्यात प्रशासनाने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत. जिल्ह्याची पावसाची वार्षिक सरासरी ५४५ मिलिमीटर आहे. ऑगस्ट महिन्याची पावसाची सरासरी १०७ मिलिमीटर आहे. पण पहिल्या पंधरवड्यातच ११७ मिलिमीटर पावसाने महिन्याची सरासरी ओलांडली आहे.



सोलापुरात आठवडाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जिल्ह्याच्या अनेक भागात धुमाकूळ घातला आहे. पावसामुळे मोहोळ, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी तालुक्यातील बक्षी अनेक भागात सर्वत्र पाणी आले आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी परिश्रमाने जोपासलेल्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं (पान 2 वर..)

**सोमवारी पुन्हा पाऊस :** गेल्या ४-५ दिवसांपासून सलग पाऊस होत आहे. सोमवारी (ता. १८) पुन्हा पावसाने सकाळपासूनच सुरुवात केली. सलग तिसऱ्या दिवशी सूर्यदर्शनही झाले नाही. दिवसभर मोहोळ, अक्कलकोट, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुक्यात पावसाची थांबून-थांबून रिपरिप सुरुच होती. महाराष्ट्राची राजधानी मुंबईसह राज्यभरात पावसाने धुमाकूळ घातला असून मुंबई, कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात धुव्वादार पाऊस सुरू आहे. कोकण, विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक नद्यांना पूर आला असून लातूर, नांदेड जिल्ह्यात पावसाने मोठं नुकसान झालं असून मनुष्यहानी व जनावरेही दगावल्याचं पाहायला मिळत आहे. गेल्या दोन दिवसांपासून कोसळणाऱ्या मुसळधार पावसाने राज्यभरात 16 जणांचा मृत्यू झाला आहे. त्यात, मराठवाड्यात 11 जणांचा मृत्यू झाला असून नांदेड जिल्ह्यात पूरग्रस्त परिस्थितीमुळे ९ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हे नांदेड जिल्ह्यात पोहोचले आहेत. तर, मुख्यमंत्र्यांनीही मुंबईसह महाराष्ट्रातील पूरस्थितीचा आढावा घेतला आहे. कोकण, मराठवाडा, विदर्भात अतिवृष्टी झाली असून पिकं पाण्याखाली गेली आहेत. तर, मुंबईची पुन्हा एकदा तुंबई झाली असून मुंबईतील वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेचं दिसून आलं. राज्यातील अनेक धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्याने विसर्ग देखील सुरू झाला आहे.

# इच्छुकांचा पुन्हा हिरमोड;

## प्रभाग रचना कार्यक्रम पुन्हा लांबवला

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेच्या निवडणुका आधीच सुमारे साडेतीन वर्षे लांबल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्य सरकारने प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर केला होता. यासाठी आतापर्यंत दोन वेळा मुदत देण्यात आली.

आता पुन्हा तिसऱ्यांदा प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे, त्यानंतर त्या प्रसिद्ध करणे, त्यावर हरकती सूचना मागवणे आणि अंतिम प्रभाग रचना नगर रचना विभागास सादर करण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र अंतिम प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्धीची ६ ऑक्टोबर ही तारीख कायम ठेवण्यात आली आहे.

नागपूर महापालिकेचा नगरसेवकांचा कार्यकाळ २०२१ मध्ये संपला आहे. तेव्हापासून नागपूर महापालिकेवर प्रशासक आहे. ओबीसी आरक्षणामुळे राज्यभरातील महापालिका निवडणुकीची प्रक्रिया थांबली होती. सर्वोच्च ओबीसींना २७ टक्के आरक्षण बहाल करून तातडीने निवडणुका घेण्याचे निर्देश दिले आहेत. असे असले तरी भाजप महायुती सरकारला निवडणुका घ्यायच्याच नाही असे आरोप विरोधकांमार्फत केले जात आहे.

निवडणुकीसाठी प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असला तरी निवडणुका होतीलच याची शाश्वती नसल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. ओबीसी आरक्षण आणि नव्या प्रभाग रचनेला सर्वोच्च न्यायालयात आव्हानसुद्धा देण्यात आले होते. त्यामुळे ही शंका अधिकच गडद झाली होती. मात्र सर्वोच्च न्यायालयाने आव्हान देणारी याचिका फेटाळून लावल्याने अनेकांना दिलासा मिळाला आहे.

भाजप नेत्यांच्या वक्तृव्याने महापालिकेची निवडणूक जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्यात होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आधी नगरपालिका, त्यानंतर जिल्हा परिषद आणि शेवटी महापालिकेची निवडणूक असा क्रम ठरवण्यात आला असल्याचे दावे केले जात आहे. असे असले तरी (पान 2 वर..)

# सोलापुरातील तीन माजी आमदारांसह ९ नेत्यांना सहकार मंत्र्यांची नोटीस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नुकसानीची जबाबदारी वसुलीच्या विरोधात काही माजी संचालकांनी सहकारी मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याकडे अपील केले आहे. याबद्दलची पहिली सुनावणी पार पडली आहे.

दुसरी सुनावणी बुधवारी (२० ऑगस्ट) दुपारी होणार आहे. त्या सुनावणीला हजर राहण्यासाठी तीन माजी आमदारांसह नऊ जणांना नोटीस बजावण्यात आली आहे. सहकारमंत्र्यांसमोर होणाऱ्या सुनावणीकडे सोलापूर जिल्ह्याचं लक्ष लागलं आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २३८ कोटी रूपयांच्या नुकसानीची जबाबदारी माजी संचालक, तत्कालीन अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे. परंतु, त्याच्या वसुलीला सुरूवात झाली असून, काही माजी संचालकांनी या कारवाईच्या विरोधात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यकडे अपील केले आहे.

अपिलाच्या पहिल्या सुनावणीत सहकारमंत्री पाटील यांनी वसुलीच्या कारवाईला स्थगिती दिली आहे. दुसरी सुनावणी मुंबईत सहकारमंत्री पाटील यांच्या दालनात बुधवारी होणार आहे. याबद्दल सहकार मंत्रालयाचे कक्ष अधिकारी रोहित खरे यांनी पत्र काढले आहे.

त्यानुसार माढ्याचे माजी आमदार बबनदादा शिंदे, अक्कलकोटचे भाजपचे माजी सिद्रामप्पा पाटील, करमाळ्याचे माजी आमदार संजयमामा शिंदे, सांगोल्यातील शेकापचे नेते चंद्रकांत देशमुख, मंगळवेढ्यातील नेते बबनराव आवताडे, विद्या बाबर, सुनंदा बाबर, सुरेखा ताटे, सुनीता बागल यांना सुनावणीसाठी हजर राहण्याची नोटीस बजावण्यात आली आहे.

या सुनावणीला संबंधित पक्षकाराने आपली बाजू व्यक्तिशः किंवा आपल्या वकिलांमार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर राहून मांडणे आवश्यक आहे. सुनावणीस येताना लेखी म्हणणे तयार करून आणावे आणि ते सादर करावे. या प्रकरणी संबंधित पक्षकार अनुपस्थितीत राहिल्यास गुणवत्तेवर निर्णय देण्यात येईल. सुनावणीत योग्य त्या कारणाशिवाय मुदत दिली जाणार नाही. अर्जदारांनी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्रतिवादीस देणे आवश्यक आहे, अशा सूचनाही करण्यात आलेल्या आहेत.

# पंढरपूर कॉरिडॉरसाठी ऑक्टोबरपासून भूसंपादन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील बहुप्रतिक्षित 'कॉरिडॉर' प्रकल्पासाठी आवश्यक असलेली शासकीय अधिसूचना (गॅझेट नोटिफिकेशन) प्रसिद्ध झाली असून, या सुमारे 2000 कोटी रुपयांच्या भव्य प्रकल्पासाठीची भूसंपादन प्रक्रिया येत्या ऑक्टोबर महिन्यापासून सुरू होणार असल्याची महत्त्वपूर्ण माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

या प्रकल्पामुळे केवळ पंढरीचा चेहरामोहरा बदलणार नसून, बाधितांना समाधानकारक मोबदला देत विकासाचा एक नवा आदर्श निर्माण केला जाणार आहे.

प्रकल्पाच्या भूसंपादनासंदर्भात प्रशासनाने अत्यंत सकारात्मक आणि सामंजस्याची भूमिका घेतली आहे.



संभाव्य बाधितांसोबत बैठका घेऊन त्यांची मते आणि अपेक्षा जाणून घेण्यात आल्या आहेत. पहिल्या टप्प्यात, ज्या नागरिकांनी संमती दिली आहे, त्यांची जागा संपादित केली जाईल. त्यामुळे सक्तीने भूसंपादन करण्याचा प्रशासनाचा कोणताही विचार नाही, असे जिल्हाधिकार्यांनी स्पष्ट केले. मात्र, काही ठिकाणी विरोध झाल्यास, कायद्यातील तरतुदीनुसार तीन महिन्यांनंतर सक्तीने भूसंपादन करण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे.

# निवडणूक आयोगाच्या पक्षपाती वर्तनाविरोधात दिल्लीत काँग्रेसचे आंदोलन

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** निवडणूक आयोगाच्या पक्षपाती वर्तनाविरोधात काँग्रेस पक्षाने आज संसद भवन परिसरात मोठे आंदोलन केले. नवी दिल्ली संसद भवन परिसरातील या आंदोलनात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. हातात फलक घेऊन व घोषणाबाजी करत काँग्रेस खासदारांनी निवडणूक आयोगाच्या कामकाजावर कठोर शब्दांत टीका केली. “Vote Chor”, “Election Comissioners” अशा घोषणांसह




लोकशाही धोक्यात असल्याचा इशारा देण्यात आला.

निवडणूक आयोगाची निष्पक्षता हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. मात्र आज आयोग शासनाच्या दबावाखाली वागत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. हा लढा सत्तेसाठी नाही तर जनतेच्या मतदानाच्या हक्कासाठी आहे.' या आंदोलनात अनेक काँग्रेस, INDIA आघाडीचे खासदार, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संसद परिसरात घेतलेल्या या आंदोलनामुळे विरोधकांनी निवडणूक आयोगावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# सोलापूरात कंत्राटदार यांचे प्रलंबित देयके संदर्भात भव्य आंदोलन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, हॉट मिक्स असोसिएशन, मजुर सहकारी संस्था, सोलापूर कॉंट्रॅक्टर्स असोसिएशन यांचे वतीने आज मंगळवार दिनांक १९ ऑगस्ट रोजी सोलापूर जिल्हा परिषद समोरील पुनम गेट येथे कंत्राटदार यांचे फार मोठे धरणे आंदोलन आज प्रचंड संख्येने उपस्थित असलेल्या कंत्राटदार यांचे उपस्थितीत पार पडले.

सदर आंदोलन मध्ये सर्व विभागाकडील कंत्राटदार यांचे प्रलबिंत देयके शासन गेल्या आठ महिन्यांपासून देत नाही यामुळे सर्व उपस्थितांनी नाराजी व्यक्त केली तसेच अनेक शासनाचे चुकीचे धोरणांचा फटका शेती नंतरचा महत्त्वाचे व्यवसाय असलेला बसला आहे.राज्यातील वित्तीय संस्था कंत्राटदार यांचे घरी येऊन दमदाटी करून कजार्चे हप्ते वसुली करीत आहेत तसेच यामुळे कंत्राटदार यांचे सिबिल खराब झाले आहे. यांस शासन जबाबदार आहेत,तसेच मुख्यमंत्री यांचे बरोबर बैठक होणे आवश्यक



आहे यासाठी मागील हप्ता मध्ये शिष्टमंडळ मा माजी सहकार मंत्री व विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांना भेटले होते त्यांनी सुद्धा मुख्यमंत्री यांचे बरोबर बैठक आयोजित करण्यात आपण नक्कीच यशस्वी करू व विषय मार्गी लावु असे आश्वासन दीले आहे. सदर आंदोलनास आखिल भारतीय काँग्रेस ने मंडपात येऊन त्यांचे जिल्हा अध्यक्ष शांतलिंग शटगार, शहर अध्यक्ष चेतन नरोटे, सरचिटणीस विनोद भोसले यांनी लिखित पाठिंब्याचे पत्र दिले आहे. सदर आंदोलन ही राज्यात ३५ जिल्हा मध्ये झाले आहे ही फार मोठी बाब आहे. सोलापूर जिल्हाधिकारी यांनी सदर संघटनेचे शिष्टमंडळ बरोबर या सविस्तर चर्चा केली पुढील गोष्टी करण्यासाठी मी शासन दरबारी आपला विषय घेऊन सहकार्य करेल तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री सोलापुरात येणार असतील अवश्य भेट देण्यासाठी मी प्रयत्नशील राहिल असे शिष्टमंडळास आश्वासन दिले,तसेच यावेळी राज्यात गाजत असलेल्या जलजीवन मिशन चे कंत्राटदार यांचे अडचणी मांडले सदर आंदोलन फार मोठ्या प्रमाणात होऊन यावेळी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना चे राज्य अध्यक्ष मिलिंद भोसले बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया चे माजी राज्य अध्यक्ष दत्तात्रेय मुळे,शहर अध्यक्ष संतोष कलगुटगी, राज्य मजुर सहकारी संस्था चे जिल्हा अध्यक्ष शंकर चौगुले, हॉट मिक्स असोसिएशन चे शिवानंद पाटील, सिद्धेश्वर काळे, समद पिरजादे, सोलापूर महापालिका कॉंट्रॅक्टर्स असोसिएशन चे अध्यक्ष रामभाऊ धुधाळ, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ चे उपाध्यक्ष कांतीलाल डुबल, सचिव कैलास लांडे, महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना चे जिल्हा अध्यक्ष आनंद तोडकरी, सचिव विवेक राठोड, नरेंद्र भोसले,महेश जाधव,मनोहर शिराळ, नित्यानंद शिंदे, हणमंत कुलकर्णी, युवराज चुबंळकर,रॉकी बगांळे,विलास पाटील, सुधीर लांडे, राघवेंद्र कूलकर्णी,शेखर शिवशरण, सादिक शेख,अमृत पवार,सचिन गुंड, विनोद क्षीरसागर, शशिकांत शिंदे, विनोद चव्हाण, सिद्धराम ढंगापुरे,संजय मस्के, राजकुमार खुर्द श्रीनिवास इगवले, हणमंत तरंगे,गोरख देशमुख, राघवेंद्र कूलकर्णी सह बहुसंख्येने जिल्हा भरातुन कंत्राटदार उपस्थित होते.










## संपादकीय

# प्रश्न अनुत्तरितच!

देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषद घेत काँग्रेसकडून सुरू असलेल्या आरोपांबाबत आपली भूमिका मांडली. ज्ञानेश कुमार यांच्या या पत्रकार परिषदेविषयी देशभर उत्सुकता होती, पण त्यात त्यांनी जी भूमिका मांडली ती सरळ सरळ पक्षपातीपणाचीच दिसली. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावर जे आक्षेप घेतले जात आहेत त्या आक्षेपांपैकी एकालाही समाधानकारक उत्तर दिले नाही. त्यामुळे ही पत्रकार परिषद केवळ निराशाजनकच नव्हे; तर प्रचलित वादात आणखीनच नवीन प्रश्नांना जन्म देणारी ठरली. राहुल गांधी यांनी बंगळुरू मध्य लोकसभा मतदारसंघातील गैरप्रकाराच्या संबंधात पुराव्यासह आरोप केले आहेत.

त्या लोकसभा मतदारसंघ अंतर्गत येणाऱ्या एकूण सात विधानसभा मतदारसंघांपैकी सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये काँग्रेसला बढत आहे आणि केवळ एकाच मतदारसंघात भाजपला इतकी मोठी बढत मिळाली आहे की त्यात त्यांनी बाकीच्या मतदारसंघात झालेली पिछाडी भरून काढून काँग्रेस उमेदवारावर तब्बल 35 हजार मतांनी मात केली आहे. एकूण पाच प्रकारे त्या मतदारसंघांमध्ये मतदानाचा घोळ झाला आहे, याला काँग्रेसचे नेते मतदानाची चोरी असे म्हणाले आहेत. अशीच चोरी देशभरातील अनेक मतदारसंघांमध्ये झाली असून त्याद्वारे भाजपाने गैरमार्गाने केंद्रातील सत्ता मिळवली असल्याचा आरोप आहे. या सगळ्या आरोपांविषयी एव्हाना सगळ्यांना कल्पना आली आहे. ज्या दिवशी निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद झाली त्याच्या आदल्या दिवशीच निवडणूक आयोगाने एक प्रेस नोट जारी केली होती. लागोपाठ दुसऱ्या दिवशी त्यांनी एक जाहीर पत्रकार परिषदही घेतली, पण या दोन्ही वेळेला मूळ आक्षेपाला कोणतेही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. उलट यावेळी पत्रकारांकडून जे टोकदार प्रश्न विचारले गेले त्या प्रश्नांना थेट उत्तर देण्याचेही मुख्य निवडणूक आयुक्तांनी टाळले. त्यामुळे एकूणच हा सारा प्रकार नुसता फार्सच ठरला नाही तर, निवडणूक आयोग कोणाच्या इशाऱ्यावर काम करतो आहे हे संपूर्ण देशापुढे स्पष्ट झाले आहे. ज्ञानेश कुमार यांनी दिलेली उत्तरे इतकी मासलेवाईक आहेत की ती ऐकताना कोणालाही हसूच येईल. विरोधी पक्षांनी मतदान प्रक्रियेचे सीसीटीव्ही फुटेज मागितले आहे, ते नाकारताना ज्ञानेश कुमार असे म्हणाले की, हे सीसीटीव्ही फुटेज दिले तर मतदानात सहभागी झालेल्या आपल्या माता, भगिनी आणि महिलांचे चित्रीकरण खुले करावे लागेल, त्यातून महिला मतदारांचे खासगी चित्रण बाहेर येईल. त्यामुळे हे सीसीटीव्ही फुटेज मी कसे देऊ, असा पोरकट प्रतिवाद करताना ते दिसले. वास्तविक त्यांच्या याच एका मुद्द्यावर देशभरातून जोरदार टीका सुरू आहे. विरोधी पक्षाच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाकडे मशीनरीडेबल मतदार यादी मागितली आहे, पण त्यात विरोधी पक्षांकडून फेरफार होण्याची शक्यता असल्याने अशी यादी देता येणार नाही, असाही पवित्रा त्यांनी घेतला आहे. ही सगळी उत्तरे ऐकल्यानंतर निवडणूक आयोग पक्षपातीपणे वागते आहे हे स्पष्ट होते आहे, एवढेच नव्हे तर ते संपूर्ण देशालाच मूर्ख समजू लागले आहेत काय असाही प्रश्न त्यातून निर्माण होतो. राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर जे आक्षेप घेतले त्या संदर्भात राहुल गांधी यांनी सात दिवसात प्रतिज्ञापत्र सादर करावे अन्यथा निवडणूक आयोगाची माफी मागावी, याखेरीस तिसरा पर्याय आमच्या पुढे उपलब्ध नाही, असेही ज्ञानेश कुमार म्हणाले आहेत. वास्तविक राहुल गांधी यांनी केवळ एका मतदारसंघातील बोगस मतदानाचे पुरावे सादर केल्यानंतर भाजपाने अनुराग ठाकूर यांना राहुल गांधी यांच्या विरोधात मैदानात उतरवले आणि अनुराग ठाकूर यांनी विरोधी पक्षांच्या उमेदवारांचा विजय झालेल्या सहा मतदारसंघात किती बोगस मतदान झाले याची आकडेवारी सादर केली. म्हणजेच राहुल गांधी यांनी जो आरोप केला तशाच स्वरूपाचा आरोप केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी निवडणूक आयोगावर केला आहे. ज्या आरोपांबाबत निवडणूक आयोग राहुल गांधी यांच्याकडे शपथपत्र मागते तसेच शपथपत्र केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्याकडून का मागवले जात नाही या प्रश्नालाही मुख्य निवडणूक आयुक्तांकडे उत्तर नाही. हा सगळा विषय आता पोरकटपणाच्या पातळीवर गेला आहे. त्यातून निवडणूक प्रक्रियेविषयीचे शंकानिरसन होण्याऐवजी देशातील ही सगळी निवडणूक प्रक्रियाच संशयाच्या गर्तेत सापडली असून त्याविषयी जनतेच्या मनात मोठाच असंतोष खदखदू लागला आहे. ही परिस्थिती निवडणूक आयोगामुळेच उद्भवली आहे, हे नाकारता येणार नाही. बिहारमधील मतदार यादी गहन पुनर्निरीक्षणासंबंधात जे आक्षेप आहेत त्याच्या विरोधात राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी रविवारपासून बिहारमध्ये एक मोठी प्रचार यात्रा सुरू केली आहे. रविवार होता आणि नेमक्या त्याच दिवशी निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेऊन विरोधी पक्षांवर जे हल्ले चढवले त्याच्या टायमिंगविषयीही आक्षेप नोंदवले गेले आहेत. भाजप हेडलाइन मॅनेजमेंटसाठी ज्या वेगळ्या कल्पना राबवते तसाच हाही प्रकार होता असे लोकांना वाटू लागले आहे. भाजप एक सत्ताधारी राजकीय पक्ष आहे, ते त्यांच्या निवडणूक रणनीतीचा भाग म्हणून कोणतीही कृती करू शकतात, पण निवडणूक आयोगही भाजपच्या निवडणूक रणनीतीचा भाग कसा काय बनू शकतो हा मुख्य प्रश्न आता निर्माण झाला आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या या भूमिकेच्या विरोधात विरोधी पक्षाचे नेते आता महाभियोग प्रस्ताव आणण्याच्या विचारात आहेत. अर्थात त्यांनी तो मांडला तरी संख्याबळाच्या आधारे तो फेटाळला जाईल हे जरी खरे असले तरी याद्वारे निवडणूक आयोग आणि देशातील विरोधी पक्ष यांच्या संघर्षाची व्याप्ती वाढत जाणार आहे आणि त्यातून देशातल्या लोकशाहीवरच प्रश्नचिन्ह लागणार आहे हे मात्र खरे.

# ओपन बुक परीक्षा म्हणजे काय?

ओपन बुक परीक्षा म्हणजे कॉपी करण्याचा मुक्त परवाना! असं शिक्षण व्यवस्थेबाहेरीलच नव्हे तर शिक्षण प्रक्रियेतील लोकांनाही वाटू शकतं. मात्र, प्रत्यक्षात तसं नाही. ओपन बुक परीक्षा घेण्याचा निर्णय सीबीएसई मंडळाने घेतला आहे. त्यांनी काढलेल्या सूचना पत्रानुसार इयत्ता नववीच्या भाषा, सामाजिक शास्त्र, गणित आणि विज्ञान या विषयांच्या परीक्षा पुढील वर्षी 'ओपन बुक' पद्धतीने घेण्यात येतील.

माझ्या मते हा निर्णय शिक्षण व्यवस्थेतील उंची गाठणारा आहे. कालबाह्य व्यवस्थेला चिकटून राहण्याची माणसाची सवय अनेक पिढ्यांसाठी मारक ठरते. कालानुरूप बदललो नाही, तर येणारा काळ आपल्याला माफ करत नाही.

फार पूर्वी माहिती मिळवणे आणि ती स्मरणात ठेवणे यावरच विद्वत्ता ठरली जायची. १४५० च्या आसपास जोहान्स गटेनबर्ग याने छापखान्याचा शोध लावला. गटेनबर्गच्या मुद्रणयंत्रामुळे पुस्तके मोठ्या प्रमाणात आणि स्वस्त दरात उपलब्ध होऊ लागली, ज्यामुळे शिक्षण आणि ज्ञानाचा प्रसार जलद गतीने झाला. एका पुस्तकाच्या अनेक प्रती मिळू लागल्या. त्यामुळे पूर्ण स्मरणात ठेवणे किंवा पाठांतर करणे याचे महत्त्व कमी झाले. पुस्तक संचयात ठेवून त्याचा संदर्भ घेणे आणि त्यावरून नवीन ज्ञानाची निर्मिती करणे महत्त्वाचे ठरले. तरीसुद्धा स्मरणाधारित शिक्षणाचे महत्त्व संपलेले नव्हते.

पण १८८० नंतर झालेल्या संगणक व माहिती तंत्रज्ञान क्रांतीनंतर क्षणात माहिती उपलब्ध होऊ लागली. ज्ञाननिर्मिती प्रक्रिया ही प्रत्येक काळात उपलब्ध माहिती व अनुभवांवर आधारित होती. यालाच 'ज्ञानरचनावाद' म्हटले गेले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये क्षमता-आधारित अध्ययन, अध्यापन व मूल्यमापनावर भर देण्यात आला आहे. अध्ययनात घोकंपट्टीपेक्षा प्रत्यक्ष अनुभवाला, शिकवण्यापेक्षा शिकण्याला महत्त्व दिलं जात आहे. फक्त माहितीवर भर न देता ज्ञान, कौशल्य आणि दृष्टिकोन यावर लक्ष केंद्रित केले आहे. स्वतःच्या गतीने, स्वतःच्या पद्धतीने, स्वतःच्या तंत्राने शिकण्याला आजच्या काळात विशेष महत्त्व आले आहे.

वर्गामध्ये केवळ परीक्षेतील गुणांसाठी न शिकता शिकण्याचे कौशल्य व आजन्म शिकण्याची वृत्ती वाढीस लागावी, यावर भर दिला जात आहे. यासाठी अनुभवातून, कृतीतून, खेळातून, चर्चा, संवाद, विश्लेषण आणि सर्जनशील विचार यांद्वारे अध्ययन होणे अपेक्षित आहे.

सर्जनशील विचाराला आजच्या एकविसाव्या शतकात फार मोठे महत्त्व आहे. सर्जनशील विचार म्हणजे नवनवीन कल्पना सुचणे होय. सभोवताली निरीक्षण करून योग्य मत मांडणे, प्रश्न विचारणे, उपाय सुचवणे आणि त्यातील सर्वोत्तम उपाय निवडणे हे सर्जनशील विचाराचे भाग आहेत. नवीन विचार सुचणे किंवा आधीच्या विचारातून काहीतरी वेगळं सुचणे या प्रक्रियेला गती देण्याचं काम शिक्षणाने व्हायला हवं. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात हे फार महत्त्वाचं आहे.

सर्जनशील विचार विद्यार्थ्यांमध्ये कलात्मक सौंदर्यदृष्टी, आशावादी विचारसरणी आणि सकारात्मक दृष्टिकोन रुजवतो. म्हणूनच एनईपी २०२० मध्ये मूल्यांकन स्मरणाधारित न ठेवता सातत्यपूर्ण आणि अकारिक क्षमता-आधारित ठेवण्यावर भर दिला आहे. चिकित्सक विचार, वैचारिक स्पष्टता व विश्लेषण क्षमता या उच्च बौद्धिक क्षमतांची चाचणी घेणे हाच या मूल्यांकनाचा उद्देश आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता ओपन बुक परीक्षा घेण्यात येणार आहे.

शिक्षणतज्ज्ञांच्या मते, ओपन बुक परीक्षेत विद्यार्थी नोट्स, पाठ्यपुस्तके आणि परवानगी असल्यास गॅजेट्सचा वापर करू शकतात. पण हे वापरताना आपली सर्जनशीलता आणि कल्पकता वापरून दिलेल्या प्रश्नाचे उत्तर अधिक व्यापक (सिंथेसाइज) आणि सर्वांगीण (सिनर्जिक) असावे. या सर्व गोष्टी आत्मसात करण्यासाठी परिपक्वता लागते, जी शालेय वयात कठीण आहे. त्यामुळे ही परीक्षा जास्त गुण मिळवण्याचा शॉर्टकट नाही, हे लक्षात येईल.

महत्त्वाचे म्हणजे, ही पद्धत यशस्वी करण्यासाठी अध्ययन, अध्यापन आणि मूल्यांकनाचा दर्जा उंचीचा असणे अत्यावश्यक आहे. तो आहे का, याची तपासणी झाली पाहिजे. तसेच आपले शैक्षणिक, सामाजिक आणि मानसिक वातावरण या पद्धतीसाठी पोषक आहे का, हेही पाहिले पाहिजे.

मी जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या एका पुस्तकावर ओपन बुक परीक्षा घेतली होती, तेव्हा मी असा प्रश्न विचारला होता :

'तुम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात भरती व्हायचे आहे. त्यासाठी सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या नावे नोकरीचा अर्ज करा.'

अशा प्रकारच्या प्रश्नांतूनच खरी ओपन बुक परीक्षा घेता येईल, ही अपेक्षा आहे.



**किशोर जाधव, सोलापूर**
- मो. नं. ९९२२८८२५४१

# लोकमान्य संयुक्त महामंडळाच्या उत्सव अध्यक्ष पदी दत्ता भोसले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सालाबाद प्रमाणे यंदाच्या ही वर्षी शहराच्या मध्य केंद्रबिंदू असलेल्या लोकमान्य संयुक्त गणेशत्सव महामंडळाची नुकतीच बैठक हृदयसम्राट स्व. कै. मुरलीधर घाडगे त्र मु.पैलवानत्र येथे नुकतीच संपन्न झाली. ही बैठक पुरुषोत्तम बरडे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, राजन जाधव, खलिफा पैलवान दत्तात्रय कोलारकर, प्रतापसिंह चौहान, श्रीकांत घाडगे, शिवाजी चव्हाण, अंबादास शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

सुरुवातीस मानाचा श्री पणजोबा गणपती व हृदयसम्राट स्व. कै. मुरलीधर घाडगे त्र मु.पैलवानत्र यांच्या फोटोस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालण्यात आला. यानंतर इ.सन १९७५ ते १९७७ या काळात लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मूल्यांच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीतही उभे राहून छाती ठोकपणे तत्कालीन हुकूमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून कारावास स्वीकारून स्वातंत्र्य, अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष केला.देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील या महत्वपूर्ण योगदानाची दखल घेऊन राज्य सरकारच्या वतीने हृदय सम्राट स्व. कै. मुरलीधर घाडगे त्र मु.पैलवानत्र यांच्या वारस पत्नी माजी उपमहापौर सुषमाताई घाडगे यांना यांचा विशेष गौरव करण्यात आला. तसेच पुण्यश्लोक अहिलदेवी होळकर विद्यापीठ यांच्या कडून नुकताच सामाजिक कायार्ची दखल घेऊन दत्ता भोसले यांना पुरस्कार देण्यात आला. या दोन्ही पुरस्कर्त्यांचा अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला.यानंतर गणेशोत्सव २०२५-२६ च्या नूतन कार्यकारणीची निवड संपन्न झाली. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवड प्रक्रियेनंतर नूतन उत्सव अध्यक्ष दत्ता भोसले यांचा व नूतन कार्यकारिणीचा सत्कार करून उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान सर्व मंडळानी नियमांचे तंतोतंत पालन करावे.कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून जल्लोष पूर्ण वातावरणात मिरवणुका पार पाडाव्यात. परवान्या बाबत कोणत्या मंडळाला अडचण असल्यास त्यांनी मध्यवर्ती महामंडळाशी संपर्क साधावा.पोलिस बांधवांनी दिलेल्या आदेशाचे पालन करावे. डॉल्बीमुक्त गणेशोत्सव साजरा करण्यावर भर द्यावा.असे आवाहन पुरुषोत्तम बरडे, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, राजन जाधव, श्रीकांत घाडगे यांनी केले.

या बैठकीस जवाहर जाजू, शेखर फंड, बजरंग जाधव, सुहास कोलारकर, राहुल बनसोडे, देविदास घुले, सचिन स्वामी, महेश जगदाळे, विजय कांबळे, पत्रा तालीम युवक क्रीडा व सांस्कृतिक मंडळ उत्सव अध्यक्ष आदित्य घाडगे,मारुती सावंत, बसवराज कोळी,पवन पाटील, योगेश क्षीरसागर, अनिकेत व्यवहारे, संकेत ढोबळे, आकाश जाधव, विजय व्यवहारे, आदिनाथ जावळे, मनोज जाधव, वैभव दांडगे, पुरवंत काळे, बसवराज गुब्याड, यांच्यासह मंडळाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

# इच्छुकांचा पुन्हा हिरमोड...

वारंवार प्रभाग रचनेसंदर्भातील प्रक्रियेस मुदतवाढ दिली असल्याने नेमक्या निवडणुका केव्हा होतील यावर शंका व्यक्त केली जात आहे.

प्रभाग रचनेकरिता नगर विकास विभागाने दिलेल्या वेळापत्रकात आतापर्यंत तीन वेळा बदल झाला आहे. प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध करणे व त्यावर हरकती, सूचना मागवण्यासाठी ११ ते २८ ऑगस्ट अशी मुदत देण्यात आली होती. आता ती वाढवून ४ सप्टेंबर करण्यात आली आहे. सरकारने नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याने प्राप्त हरकती सूचनांवर २९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर अशी मुदत दिली होती. यातही वाढ करण्यात आली आहे. नव्या आदेशानुसार ५ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर हे नवे वेळापत्रक यासाठी देण्यात आले आहे. सुनावणीनंतर हरकती व सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन प्रभाग रचना अंतिम करून नगर विभागास सादर करायची शेवटची तारीख ९ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर होती. त्यात थोडा बदल करण्यात आला आहे.

आता नऊ ऐवजी १३ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर अशी सुधारणा वेळापत्रकात करण्यात आली आहे. निवडणूक आयुक्त यांनी अंतिम केलेली प्रभाग रचना अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यासाठी ३ ते ६ ऑक्टोबर हा कालावधित निश्चित केला होता. तो नव्या आदेशात कायम ठेवण्यात आला आहे. मात्र तोसुद्धा बदलल्या जाऊ शकतो अशी शक्यता वर्तविली जात आहे.

## प्रबोधन

# एकत्र कुटुंब : अवगुणांची खाण

एकत्र कुटुंबपद्धती श्रेष्ठ, की विभक्त कुटुंबपद्धती श्रेष्ठ, याचा समाजशास्त्रीय विचार काय असेल, तो असो. पण परवाच्या एका घटनेने या प्रश्नाचा गंभीरपणे विचार होणं आवश्यक आहे, अशा निष्कर्षाला येण्यास भाग पाडणारी, मनाला चटका लावणारी एक घटना परवा एका जिल्ह्यात घडली.

एका एकत्र कुटुंबातील स्त्रीने आपल्या स्वतंत्र संसारासाठी आत्माहुती दिली. ती लग्न झाल्यापासून आपल्या वेगळ्या संसाराची स्वप्नं पाहात होती. तिला वेगळा संसार मांडायचा होता. नवऱ्याच्या पगारात प्रपंच चालवून चांगली गृहिणी, कर्तबगार संसारदक्ष स्त्री, असं चारचौघींकडून म्हणवून घ्यायचं होतं. त्यासाठी ती नवऱ्याला परोपरीने अर्ज, विनंत्या, हट्ट, रुसवा सगळं काही करून विनवत होती. पण तो तिचा अर्ज काही ना काही कारणं सांगून फेटाळत होता. परिणामी एका घरवेडीचं बलिदान घडलं.

आई-बाप फारच वत्सल असतील, तर त्यांची मुलं बाप होऊनही बालपण सोडत नाहीत. ही एक प्रचंड समस्या आहे. आईच्या पदराखाली जशी तान्हुली कशालाही घाबरून लपतात, तशी ही ३०-३५ वर्ष वयाची बाळं समाजाला घाबरतात. शेजाऱ्यापाजाऱ्यांना घाबरतात. सण-समारंभ, रीति-रिवाज, देणेघेणे, आचार-व्यवहार, आदिंबाबत स्वतंत्रपणे विचार करायला घाबरतात आणि त्यामुळे स्वतंत्र बिऱ्हाड करून राहायलाही घाबरतात. आपलं घर सोडायचं म्हणजे फार मोठी जोखीम अंगावर घ्यायची, अशी त्यांची ठाम समजूत झालेली असते. एकत्र कुटुंब हे एक संरक्षककवच आहे, असा गैरसमज त्यांनी करून घेतलेला असतो. एकत्र कुटुंबाची स्तुती आणि वेगळं बिऱ्हाड थाटू पाहाणाऱ्यांची निंदा करून समाज फार मोठी चूक करीत आला आहे, असं अशावेळी वाटतं. याविषयी लिहिताना लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख म्हणतात, 'आमचे लोकांमध्ये अशी चाल आहे की, कुटुंबाचे माणसातील सर्वांनी एकत्र रहावे, यापासून लाभ किंवा विभक्त राहिल्यापासून लाभ याचा विचार केला, तर असे नजरेस येते की, एकत्र रहाण्याची चाल बहुत काळापासून चालत आली आहे. लोकांमध्ये तिची प्रतिष्ठा अधिक मानतात. दोघे बंधू पाहिले तर त्यास प्रथम हा प्रश्न विचारतात की, विभक्त किंवा एकत्र आहा? एकत्र म्हणले, म्हणजे ते भले माणूस आहेत, असे समजतात.

एकत्र कुटुंबात ज्या अनिष्ट वर्तनाला चालना मिळते, ते वर्तन म्हणजे आळस. करणारा काम करून मरतो आणि बसणारे बसून पिंड पोसत राहातात. एकाचं बसणं बघून दुसराही तेच वळण गिरवतो. हळूहळू घराची प्रवृत्ती परावलंबित्वाची होऊन कुळाचा नाश होतो. अशा घरातल्या कर्तबगार, कष्टाळू माणसाचं कर्तृत्व वाळूमध्ये पाणी ओतावं, तसं लोप पावतं. कर्तबगार माणसाच्या कोणत्या स्त्रीला आपल्या पराक्रमी पुरुषाच्या कर्तृत्वाची अशी वाट लागलेली कधी पाहवेल? आपल्या पतीच्या सामर्थ्यातून भौतिक सुखसाधनांची रेलचेल होईल, अशी कल्पनाकरणाऱ्या त्या स्त्रीला स्वप्नभंगाचं दुःख केवढं होत असेल, ते शहाणा मनुष्यच समजू शकेल. एकत्र कुटुंबपद्धत अशी कुलनाशिनी आणि पर्यायाने राष्ट्रघात करू शकते, हे किती लोकांनी ध्यानात घेतलं आहे?

घर म्हणजे पुरुष की स्त्री? हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे. पुरुषाला गृहस्थ म्हटलं जातं. गृहस्थ म्हणजे घरात राहाणारा. पण गृहिणी म्हणजे ? गृहिणी म्हणजे प्रत्यक्ष घरच! म्हटलेलंच आहे की, गृहिणी गृहमुच्चते. अर्थात, गृहिणी म्हणजेच घर! गृहस्थ हा घराला तसा परकाच. घराच्या कल्याणाबाबत पुरुष पुष्कळ वेळा उदासीन असू शकतो. पण स्त्री उदासीन होऊ शकत नाही. पुरुष संन्यास घेऊ शकतो, पण स्त्री इतक्या झट् की पट् घरापासून दूर जाऊ शकत नाही. म्हणून जी गृहिणी आपल्या स्वप्नांचा चुराडा आपल्या नवऱ्याकडून होत आहे, असं पाहते, तेव्हा ती मृत्यू स्वीकारते. घर उभंच राहणार नाही, तर जीवनाला काय अर्थ आहे, हा वरील आत्महत्या केलेल्या स्त्रीच्या जीवनाचा इत्यर्थ आहे.

एकत्र कुटुंब पद्धतीत स्त्रियांची गळचेपी होते, यात वाद नाही. भारताच्या मागासलेपणात या कुटुंबपद्धतीचा वाटा फार मोठा आहे. वास्तविक स्त्रियांनी पतीला परमेश्वर वगैरे मानण्याच्या भुक्कड कल्पना धाब्यावर बसवून नव्या उमेदीने जीवन उभारलं पाहिजे. विवेकानंद म्हणतात, 'स्त्रियांनीच आपली योग्यता इतकी वाढवायला पाहिजे की, आपले प्रश्न त्या आपल्याच पद्धतीने सहज सोडवू शकतील.' एकत्र कुटुंबपद्धतीचा नाश सुबुद्ध स्त्रियांनीच केला पाहिजे. तेव्हा लक्षात ठेवा-

एकत्र कुटुंबे । भरली दोषांनी
अवगुणखाणी । म्हणा त्यांना ॥१
एक कमवितो दहाजण खाती
कर्तृत्वाची माती । सज्जनाच्या ॥ २
विभक्तकुटुंब। स्वगार्ला लाजवी
स्वावलंबजीवी । होती सारे ॥३
आत्मविश्वासाला । मिळते पोषण
स्वतंत्र जीवन। जगताना ॥४
स्वतःच्या पायाने । चालाया शिकती
वाढ घेई गती । प्रतिक्षण॥५
एकत्र कुटुंबे । सदा धुमसती
ज्वालामुखीची ती । जणू दारे ॥६
एकत्र कुटुंबी । होतसे शोषण
कष्टमूर्ती दीन । हीन होई ॥७
दुबळी माणसे । एकत्र राहती
राष्ट्रघाता होती । कारण ते ॥८
स्वावलंबी व्हावे । पराक्रमी व्हावे
सर्वांनी जगावे। आनंदाने ॥ ९
विभक्त कुटुंबा। निंदता मूर्ख
दुबळ्यांचे सुख । पारतंत्री ॥ १०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सोलापूर विद्यापीठात 'सामाजिकशास्त्रे संशोधनातील नवे प्रवाह' वर कार्यशाळा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाजातील शेवटच्या घटकापर्यंतच्या समस्यांचा अभ्यास करून व त्यांच्या गरजा ओळखून उपयोगी व विकासाभिमुख संशोधनावर शिक्षक व संशोधकांनी भर द्यावा, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.



मंगळवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलाच्यावतीने पीएम उषा विभागाच्या सहकार्याने सामाजिकशास्त्रे संशोधनातील नवे प्रवाह या विषयावरील आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. महानवर हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा येथील मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल वावरे, सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, पीएम उषा विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, कार्यशाळेचे समन्वयक प्रा. ऋषिकेश मंडलिक, प्रा. सचिन शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ, महानवर म्हणाले की, समाजाशी निगडित संशोधनाला विशेष महत्व राहते. संशोधन झाल्यानंतर त्याचा समाजाला किती उपयोग होतो, हे फार महत्वाचे आहे. भारतात संशोधन व पेटंट वाढत आहे, ही चांगली बाब आहे. विद्यार्थी व नव संशोधकांनी समाजाला भेडसावणाऱ्या प्रश्नांवर संशोधन करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

डॉ. वावरे म्हणाले की, संविधानिक मूल्यांची जाणीव संशोधकांना हवी. सामाजिक बदल वेगाने होत आहेत. त्याचा अभ्यास व संशोधन सामाजिकशास्त्रे विभागातील विद्यार्थी व अभ्यासकांनी करणे आवश्यक आहे. नवतंत्रज्ञानामुळे आज समाजात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. एआयमुळे रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने गुणवत्तापूर्ण संशोधन विद्यार्थी व शिक्षकांनी करावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी डॉ. गौतम कांबळे व डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी सामाजिकशास्त्रे संकुलाच्या विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अंबादास भास्के यांनी केले.

पान १ वरून

# सोलापूर जिल्ह्यात सलग पावसामुळे शेतीचे नुकसान...

आहे. मागील चार दिवसात तर त्याचा जोर आणखीनच वाढला आहे. या पावसामुळे या भागात नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. रस्त्यावर आलेल्या पाण्यामुळे अनेक गावात नदी आणि ओढ्यांना पूर सदृश परिस्थिती आली आहे. नदी- ओढ्यांवर आलेल्या पुरामुळे बक्षी हिप्परगे ते सोलापूर जिल्ह्यातील वरळेगांव, वडजी आणि मराठवाड्यातील सीमावर्ती भागातील खडकी धोत्री या मार्गाची वाहतूक खंडित झाली आहे. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतात सर्वत्र पाणी साचले असून, त्यामुळे खरिपातील तूर, उडीद, सोयाबीन, मुग यासह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. उत्तर सोलापुरातील नान्नज, मार्डी, कारंबा, वडाळा, पडसाळी, गुळवंची या भागातील अनेक शेतकऱ्यांची पिके पाण्यात आहेत. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालय आणि कृषी विभागाने पंचनामा सहकार्य सुरू केले आहे. नुकसानीचे पंचनामे झाल्यावर राज्य शासनाला अहवाल देण्यात येणार आहे, ज्यावरुन शेतकऱ्यांना बँक खात्यांमध्ये थेट भरपाई पाठविण्यात येणार आहे.

### मराठवाड्यात पावसाने 11 जणांचा बळी

मराठवाड्यात 14 ऑगस्टपासून मराठवाड्यात जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे अनेक भागात जनजीवन विस्कळीत झाला आहे. तर काही जिल्ह्यांमध्ये जीवितहानी देखील केली आहे. मराठवाड्यात पावसामुळे आतापर्यंत 11 लोकांचा बळी गेला आहे. 498 छोट्या मोठ्या जनावरांचा मृत्यू झाला आहे. तर 350 पेक्षा अधिक घरांची आणि गोठ्यांची पडझड झाली आहे. सोबतच 1154 गावांना पावसाचा फटका बसला आहे. मराठवाड्यातील 4 लाख 38हजार 451 शेतकरी पावसामुळे बाधित झाले आहे. तसेच 3 लाख 58 हजार 370.55 हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाला आहे.

### विदर्भात 50 गावांचा संपर्क तुटला

विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम आणि बुलढाणा या जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने यलो अलर्ट जारी करण्यात आला होता. गडचिरोली जिल्ह्यासह लगतच्या परिसरात सोमवारी सायंकाळपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. गेल्या 24 तासात 12 तालुक्यात 52.1 मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून 15 मंडळात मुसळधार तर 10 मंडळात अतिमुसळधार पावसाची नोंद झाली. या पावसामुळे सद्यस्थितीत 10 जिल्हा मार्ग बंद असून पर्लकोटा नदीच्या पुरामुळे भामरागड-आल्लापल्ली हा राष्ट्रीय महामार्गही बंद झाला आहे. परिणामी तालुक्यातील 50 हून अधिक गावांचा संपर्क तुटला आहे. मुसळधार पावसाने गडचिरोली शहरातील अनेक सखल भागांमध्ये पाणी साचले असून आपत्ती व्यवस्थापन करणारी नगरपालिकाच पाण्याखाली गेल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, हवामान विभागानुसार 20 तारखे पर्यंत विदर्भातील दक्षिणी जिल्ह्यांमध्ये म्हणजेच यवतमाळ चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात दमदार पावसाची शक्यता आहे. 21 ऑगस्ट पासून मात्र पावसाचा जोर कमी होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# अनुदानित रासायनिक खत विक्रीसाठी एल-1 बायोमेट्रिक PoS मशिन अनिवार्य

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डीबीटी प्रकल्पांतर्गत iFMS प्रणालीवर नोंदणीकृत अनुदानित रासायनिक खत विक्रेत्यांनी नवीन एल-1 बायोमेट्रिक PoS मशिन बुधवार, दि. 20 ऑगस्ट 2025 पर्यंत कार्यान्वित करणे बंधनकारक असल्याचे आवाहन कृषि विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

**सुरक्षा मानकांनुसार बदल:** केंद्रिय खत विभागाच्या निर्देशानुसार, UIDAI च्या मानकांनुसार अधिक सुरक्षित एल-1 PoS मशिनचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. विद्यमान Lo सुरक्षा प्रमाणपत्र असलेल्या फिंगरप्रिंट स्कॅनरच्या जागी एल-1 प्रमाणित मशिन वापरण्याचे आदेश मुख्य खत पुरवठादार व इतर कंपन्यांना देण्यात आले आहेत.

**वितरण व कार्यान्वयन :** कृषि आयुक्तालयाने जिल्हानिहाय विक्रेत्यांची यादी तयार करून उत्पादक कंपन्यांना एल-1 PoS मशिन पुरवण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या विक्रेत्यांनी अद्याप नवीन मशिन प्राप्त केलेली नाही, त्यांनी ती तात्काळ घेऊन 20 ऑगस्टपूर्वी कार्यान्वित करावी. अन्यथा, जुनी Lo PoS मशिन वापरणाऱ्या विक्रेत्यांना खत खरेदी करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मशिन मोफत उपलब्ध :** नवीन एल-1 PoS मशिन खत कंपन्यांकडून मोफत दिली जाणार असून, अधिक माहितीसाठी तालुका कृषि अधिकारी कार्यालय किंवा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांच्याशी संपर्क साधावा.

## वात्रटिका

### सुगीचे दिवस आले

पाहून घ्या कोण कोठे
आज दिसतो आहे...
मांडीला मांडी लावून
नको तो बसतो आहे...
याहून वेगळे दिसणार आहे
निवडणूक जवळ येताना...
पळापळी,धक्काबुक्की होईल
इकडून तिकडे जाताना...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

